DISTRICT COURT
NAGPUR



**सरतपास श्री जी. आर मेश्राम, फिर्यादीचे अधिवक्ता यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरू**

मला साक्ष देण्यासाठी हजर राहणेबाबत साक्षसमन्स मिळाले होते. मला दि. ०५.०३.२०१९ रोजीचे समन्सची कार्बनप्रत दाखविण्यात आली. त्यावर आमचे बॅकेचा शिक्का व कमर्चारी श्री देवेंन्द्र परतेती यांची सही आहे. त्यास नि क्र. ३६ देण्यात येत आहे. मी आरोपी मदनचे

खात्याचे रेकॉर्ड आणले आहे. दि.०५.०१.२०१७ रोजी आरोपीच्या खात्यात एकुण रू. ४६,८८३.१२ एवढे शिल्लक होते. दि. २४.०३.२०१७ रोजी मीना सोनेकर यांनी चेक क्र. ३३५२ त्यांचे संयुक्त खाते क्र ८७३८१०११०००२००६ या खात्यात जमा केला होता. आता मला नि क्र. २४ दाखविण्यात आला तो तोच आहे. नि क्र. २४ मदन रावण हिवारे यांचा खाते क्र. ८७३८१११०००००११६ चा आहे. चेक वापसी मेमो नि क्र. २५ मला दाखविण्यात आला. कारण क्र. १६ प्रमाणे अपुरी रक्कम असल्याने मदनने दिलेला चेक वटला नाही. नि क्र. २५ वर आमचे बॅकेचा शिक्का व बॅकेचे अधिकारी म्हणुन माझी सही आहे. तो तोच आहे. आरोपी मदन हिवारे आमचे शाखेत कार्यरत होता.

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री एन.पी. बागडे यांचे मार्फत शपथेवर सुरू**

दि. २४.०३.२०१७ रोजी फिर्यादीने चेक बॅकत जमा केला त्याची पावती मी आणली आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर चेक मी स्वत: रिसिव्ह केला नाही. साक्षीदार सांगतो की बॅकेच्या अधिका-याने रिसिव्ह केला. मी सदर चेक जमा केल्याची पावती प्रकरणात दाखल केली नाही. नि क्र. २४ चे मागे आमचे बॅकेचे संबंधित वेळेचे शाखा प्रबंधकाची सही व बॅकेचा शिक्का आहे परंतु त्यावर तारीख नाही. नि क्र. २४ च्या मागे लिहिलेला मोबाईल क्रमांक ज्यांनी चेक जमा केला त्यांचा आहे. नि क्र. २५ वर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की सही खाली तारीख लिहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. २४.०३. २०१७ रोजी फिर्यादी मीना आमचे शाखेत आली नाही व तीने चेक जमा केला नाही.हे म्हणणे खरे नाही की नि क्र. २५ मी खोटा निर्गमित केला व तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की चेक नि क्र. २५ मधे नमुद केलेले कारण क्र. १६ अपुरी रक्कम असल्याने वटला नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की ०५.०१.२०१७ रोजी

DISTRICT COURT NAGPUR

आरोपीचे खात्यात रूपये ४६८८३.१२ असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीचे सांगण्यावरून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

-

श्रवणोत्तर स्वीकृती

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक १८.०३.२०१९

समक्ष

(म. सु. बनचरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक
दिनांक १८.०३.२०१९

DISTRICT COURT
NAGPUR